वाचले:-१.मा.जिल्हाधिकारी धुळे यांचेकडील आदेश क्रमांक १९८२/ब/कक्ष.२/जमीन(२)/१३६/८६.दिनांक ११/३/१९८२
२.तहसिलदार शहादा यांचेकडील अहवाल क्रमांक ०५/गावठाण/कावि/३६१/०५ दिनांक १६/९/२००५
३. अध्यक्ष जिवन साधना विद्या प्रसारक मंडळ लोणखेडा तालुका शहादा यांचा दिनांक १७/२/२००३ रार्जाचा मुदतवाढ व सनद बाबतचा अर्ज

क्रमांक २००५/ब/कक्ष-२/गावठांण/कावि/१२८.
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार
नंदुरबार, दिनांक:२१/१०/२००५

**आदेश.**

उपोदघातातील अ.क्र.१ चे आदेशान्वये अध्यक्ष जिवन साधना विद्या प्रसारक मंडळ लोणखेडा तालुका शहादा या शैक्षणिक संस्थेस मौ.लोणखेडा ता.शहादा येथील स.न. २५६ पै.क्षेत्र ०.४६ आर जागा क्रिडांगणसाठी आदेशांचे तारखेपासुन१५ वर्ष मुदतीकरीता नाममात्र भोगवटा मुल्य १ रुपये वर मंजुर केलेली आहे. आदेशातील शर्त क्रमांक ६ नुसार संस्थेने विहित नमुन्यात आजतागायत सनद मंजुर करुन घेतलेली नाही.जागेस मुदतवाढ व सनद मिळणेकामी संस्थेने दिनांक १७/२/२००३ रोजी अर्ज सादर केला.

प्रस्तुत प्रकरणी चौकशीअंती दिसुन आले की, संस्थेने आदेशातील शर्त क्रमांक ६ चा भंग केला. म्हणुन जागा मंजुर केले पासुन २००५ पावेतो अकृषिक सारा.तडजोड फी, अशी एकुण रक्कम रुपये ४१३१२/- दिनांक ८/९/२००५ रोजी आणि महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ३२१ अन्वये दंड रक्कम रुपये १०००/- दिनांक ४/२/२००३ रोजी सरकार जमा केली आहे. प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक २००४/गावठांण/कावि-२११.दिनांक ११.४.२००५ अन्वये चौकशीअंती शिफार केलेली आहे.

उपरोक्त परिस्थीतीवरुन मी जिल्हाधिकारी नंदुरबार महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे तरतुद नुसार उक्त संस्थेस या आदेशाचे दिनांकापासुन पुढील १५ वर्षापावेतो मुदतवाढ खालील अटी / शर्तीवर मंजुर करीत आहे.

१. क्रिडागंण हे सर्व जाती धर्माचे विद्यार्थ्याना वापरणेस संस्थेकडुन कोणतीही अट घालणेत येणार नाही.

२. जागेचा वापर क्रिडांगणा शिवाय इतर प्रयोजनासाठी करता येणार नाही. संरक्षक भिंत व्यतिरिक्त कुठल्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

३. मुदतवाढ काळात संस्थेस शैक्षणिक विभागाकडुन सलग मान्यता न मिळाल्यास प्रस्तुत आदेश रद्द समजण्यात येईल.

४.क्रिडागणाची जागा अन्य कोणासही बक्षीस/गहाण/विक्री अथवा अन्य मार्गाने हस्तांतरण करता येणार नाही. विल्हेवाट लावता येणार नाही.

५.संस्थेने ३० दिवसांचे आत विहीत नमुना नंबर २ मध्ये सनद मंजुर करुन घ्यावी.

६.तात्पुरता अथवा कायम स्वरुपात ज्या ज्या वेळी शासनास उक्त जागेची आवश्यकता असेल त्या त्या वेळी संस्थेने विनाअट शासनाचे ताब्यात दयावी.

७.प्रस्तुतचे आदेश कोणत्याही क्षणी विनासुचना मागे घेणे /संस्थेकडुन जमीन काढुन घेणे इत्यादी अधिकार शासनाने राखुन ठेवलेले आहे.

८.वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जागेचा ताबा संस्थेकडुन काढण्यात येईल त्या पोटी कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

२१/१०/०५

जयंत गायकवाड
जिल्हाधिकारी नंदुरबार

प्रत:- अध्यक्ष, जिवन साधना विद्या प्रसारक मंडळ लोणखेडा ता.शहादा